# विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप बोदवड महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम - मुख्याध्यापक बडगुजर

(5.09.2019) बोदवड हा ग्रामीण भाग असून प्रवेशित विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या गरीब आहेत विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकाचे संच वाटप करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार महाविद्यालयाने केला या स्तुत्य उपक्रमाचा आनंद वाटतो असे प्रतिपादन न ह रांका विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री जे आर बडगुजर यांनी पुस्तक वाटप कारिकर्मात केले

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथिल ज्ञानप्राप्ती केंद्राच्या वतीने महाविद्यालयातील कला,वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेच्या 35 गरीब विद्यार्थ्यांना पुस्तक संच वाटपाचा कार्यक्रम श्री बडगुजर याचे शुभ हस्ते दि 5 सप्टेंबर 2019 रोजी सपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य डी एस पाटील ज्ञानप्राप्ती केंद्र सल्लागार समिती सदस्य डॉ मधुकर खराटे, प्रा अजय पाटील व केंद्र सचालक डॉ माधवराव वराडे उपस्थित होते

पुस्तकरूपी ज्ञानसंपदा ही विद्यार्थ्यांची भविष्यकालीन संपत्ती आहे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेद्वारे लाभ देण्यात येईल असे प्राचार्य अरविद चौधरी यां नी घोषित केले

कारक्रमाचे सूत्रसंचालन प्रा अजय पाटील यांनी केले तर प्रास्ताविक केंद्र सचालक डॉ माधवराव वराडे यांनी केले







